आषाढी एकादशीच्या शुभेच्छा

दैनिक
# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 146 ■ रविवार, दि. 6 जुलै 2025 ■ पाने 04





## विठ्ठल भेटीचा सुख सोहळा

महिनाभर पंढरीच्या वाटेवर लाखो वैष्णव हाती टाळ, मृदंग, तुळशी, पताकांचे भार सांभाळत संतांचा व विठ्ठल नामाचा गजर करीत अखेर आषाढी एकादशीला पंढरपुरात दाखल होतात. चंद्रभागेचे स्नान करून पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शनाने देह सुखावला जातो. असा विठ्ठल भेटीचा त्रिभुवनीं सोहळा पाहून भक्तीच्या महासागरात देव सुद्धा सुखावतो. आषाढी एकादशी हा वैष्णवांचा सर्वात मोठा सुख सोहळा होय. असा सुख सोहळा पाहण्यासाठी अनेक मैलांचे अंतर कापीत भक्त पंढरपूरला जातात. विठ्ठल भेटीचा सुख सोहळा अनुभवण्यासाठी.

पंढरीचे सुख नाहीं त्रिभुवनीं ।
प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।।
त्रिभुवनीं समर्थ ऐसें पैं तीर्थ ।
दक्षिण मुख वाहात चंद्रभागा ।।

संत चोखामेळा महाराज आपल्या अभंगातून पंढरपूरच्या सुखाचे वर्णन करतात. पंढरपूर मध्ये जे सुख आहे, ते इतर कोणत्याही ठिकाणी नाही. विठ्ठल अर्थात चक्रपाणी तो प्रत्यक्ष उभा आहे. स्वर्ग, पृथ्वी, पातळ या तिन्ही लोकांत अर्थात त्रिभुवनात पंढरपूर सारखे समर्थ तीर्थ नाही. दक्षिणेकडे वाहणाऱ्या चंद्रभागा नदीचा विठ्ठल चरणाला स्पर्श झाल्याने ती पवित्र आहे. वैष्णव या चंद्रभागेत स्नान करणे पवित्र मानतात.

सकळ संतांचा मुगुटमणी देखा ।
पुंडलीक सखा आहे जेथें ।।
चोखा म्हणे तेथें सुखाची मिराशी ।
भोळ्या भाविकांसी अखंडित ।।

पुढे संत चोखामेळा म्हणतात संतांसाठी वारकऱ्यासाठी पंढरपूर हे मुकुटाप्रमाणे आहे. तिथे विठ्ठलाचा भक्त आणि सखा पुंडलिक उभा आहे. अश्या सुखाची मिरास व सुखाचा ठेवा आहे. निस्सीम भोळी भक्ती करणाऱ्या भक्तांना पंढरपुरात आल्यावर अखंडित सुख मिळते. आषाढी एकादशीपर्यंत महिनाभर पंढरीच्या वारीचे नैसर्गिक संकटाना मोडीत काढून भक्तजन सारे पंढरपुरात जमा होतात. चंद्रभागा, भक्त पुंडलिक व विठ्ठलाचे दर्शन घेवून सुखावतात. हा विठ्ठल भेटीचा सोहळा संपन्न करतात.

सावळे सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर हृदयी माझे ।।
आणिक काही इच्छा आम्हां नाही चाड । तुझे नाम गोड पांडुरंगा ।।
जन्मोजन्मी ऐसें मागितले तुज । आम्हांसी सहज दयावे आता ।।
तुका म्हणे तुज ऐसे जी दयाळ । धुंडिता सकळ नाहीं आम्हां ।।

निस्सीम भक्ती भाव असणाऱ्या संतांना व भक्तांना पंढरपूरच्या देवाकडून काय हवे आहे. ते संत तुकाराम महाराज आपल्या अभंग वाणीतून व्यक्त होतात. देवाचे सावळेरूप सुंदर व मन हरण करणारे रूप माझ्या हृदयात नीरा राहो. नाम गोड असल्याने नामाशिवाय दुसरी कोणतीच इच्छा नाही. विठ्ठल नामाच्या भजनात संत तुकाराम महाराजांना तल्लीनता मिळाली. तीच पंढरपूरला जाणाऱ्या भाविकाला मिळत असते.

विठ्ठल वळसे:पाटील
पुणे –८४८४०६६०४२.

# वर्षभरात लाडकी बहीण योजनेमुळे जिल्ह्याच्या अर्थकारणात ७०० कोटींची भर

## योजनेमुळे जिल्ह्यातील ४ लाख महिलांना आर्थिक बळ

### लाडकी बहीण योजनेची वर्षपूर्ती; योजनेचा बारावा हप्ता महिलांच्या खात्यावर जमा

सज्जन यादव | आरंभ मराठी



धाराशिव –महायुती सरकारने मागील वर्षी विधानसभा निवडणुकीच्या अगोदर जून महिन्यात लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. या योजनेची या महिन्यात वर्षपूर्ती झाली असून, योजनेचा बारावा हप्ता कालच (दि.५) लाभार्थी महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आला. अतिशय महत्त्वाकांक्षी असणाऱ्या या योजनेमुळे मागच्या वर्षभरात महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनासह आत्मविश्वास निर्माण केला. या योजनेमुळे जिल्ह्याच्या अर्थकारणाला मोठी चालना मिळाली. धाराशिवसारख्या ग्रामीण जिल्ह्यातील बाजारपेठेत या योजनेमुळे चैतन्य आल्याचे चित्र दिसत आहे. दसरा, दिवाळी सारख्या सणांमध्ये बाजारपेठेत विक्रमी उलाढाल झाल्याचे आकडेवारी वरून समोर आले. बारा हप्ते मिळाल्यामुळे जिल्ह्यातील चार लाख लाभार्थी महिलांना या योजनेतून वर्षभरात प्रत्येकी १८००० रुपये मिळाले. या योजनेमुळे धाराशिव जिल्ह्याच्या अर्थकारणात तब्बल ७०० कोटींची भर पडली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला दिनांक २८ जून २०२४ रोजी महायुती सरकारने मान्यता दिली होती. या योजनेचा पहिला हप्ता १४ ऑगस्ट २०२४ रोजी लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला होता. हा हप्ता जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांसाठी एकत्रित, म्हणजेच ३००० रुपये इतका होता. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला ही रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाली होती. जून २०२५ पर्यंत या योजनेचे १२ हप्ते लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. लाडक्या बहिणींमुळे धाराशिव जिल्ह्याच्या अर्थकारणात मागील एक वर्षात तब्बल ७०५ कोटी रुपयांची भर पडली आहे. जिल्ह्यात सध्या ३ लाख ९० हजार महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील ४ लाख ३२ हजार ७०२ महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी ४ लाख १९ हजार ५९५ महिला पात्र ठरल्या होत्या. टप्प्याटप्याने यातील लाभार्थी महिलांची संख्या विविध कारणाने कमी होत गेली. सध्या ३ लाख ९० हजार महिला योजनेच्या लाभार्थी आहेत. या महिलांना मागील वर्षभरात प्रत्येकी १५०० रुपयांचे १२ हप्ते मिळाले आहेत. त्यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती आली आहे. गेल्या वर्षभरात या योजनेंतर्गत जिल्ह्यात तब्बल ७०५ कोटी रुपये आले. ही रक्कम सर्व प्रकारच्या बाजारपेठांत फिरली. काही महिलांनी स्वतःचे व्यवसायही सुरू केल्याने त्यातून होणाऱ्या दैनंदिन उलाढालीमुळे अर्थव्यवस्थेत गेल्या वर्षभरात ७०० कोटींवर रक्कम विविध मार्गाने वापरात आली. धाराशिव जिल्ह्याची लोकसंख्या २० लाखांच्या आसपास आहे. यापैकी ९ लाखांवर महिला आहेत. यापैकी १ ते १८ या वयोगटातील महिलांची संख्या सुमारे तीन ते चार लाखापर्यंत तर ६५ वर्षांवरील महिलांची संख्या सुमारे एक लाखांवर आहे. आतापर्यंत लाभार्थी महिलांना प्रत्येकी १८ हजार रुपये मिळाले आहेत. अशा प्रकारे जिल्ह्याच्या अर्थकारणात ७०५ कोटी रुपये आले आहेत. गेल्या वर्षभरात योजनेचे पैसे मिळण्यास उशीर झाला असला तरी महिलांना बारा हप्ते मात्र मिळाले आहेत.

**जिल्ह्यातील लाभार्थी महिला – ३ लाख ९० हजार**
**प्रत्येक लाभार्थी महिलेला आतापर्यंत मिळालेले पैसे हजार – १८०००**
**एका हप्त्यातून जिल्ह्याला मिळणारी रक्कम – ५८ कोटी ५० लाख रुपये**
**आतापर्यंत अर्थकारणात आलेली रक्कम ७०५ कोटी**

### योजनेला नऊ महिन्यांपासून ब्रेक

विधानसभा निवडणुकीत लक्षवेधी ठरलेल्या लाडकी बहीण योजनेला गेल्या नऊ महिन्यांपासून ब्रेक लागला आहे. सरकार स्थापन होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला, तरी या योजनेला अद्याप नव्याने मुहूर्त मिळालेला नाही. या योजनेसाठी सध्या नव्याने अर्ज स्वीकारणे बंद आहे. ऑक्टोबर–२०२४ पासून याचे पोर्टलही बंद आहे. धाराशिव जिल्ह्यात योजनेच्या ३ लाख ९० हजार महिला लाभार्थी असून, या योजनेतून कार्यालयात जाऊन ८० पेक्षा अधिक महिलांनी विविध कारणांमुळे माघार घेतली आहे. थेट अर्ज करूनही या योजनेतून अनेकांनी माघार घेतली आहे. गेल्या नऊ महिन्यात जिल्ह्यातील हजारो तरुणी आणि महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. मात्र, पोर्टल सुरू नसल्यामुळे त्या लाभार्थी होऊ शकल्या नाहीत.

## घरासमोर लावलेली चारचाकी जुन्या वादातून फोडली

आरंभ मराठी | धाराशिव

जुन्या वादातून घरासमोर लावलेल्या चारचाकी वाहनावर दगडफेक करून तसेच हत्याराने वार करून गाडीचे नुकसान केल्याची घटना धाराशिव शहरातील भानू नगर येथे घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी पंकज संतराव पवार, (वय ३० वर्षे, रा. शांतीनिकेतन भानुनगर, धाराशिव) यांच्या घरासमोर लावलेल्या चारचाकी वाहनावर (एमएच २५ एएस ५२२५) दिनांक २ जुलै रोजी आरोपी रोहीत जाधव, समीर अरब, प्रेम अमर चव्हाण, संदीप यल्लाप्पा बुटे (सर्व रा. धाराशिव) यांनी जुन्या वादाचे कारणावरुन कारवर दगड व कोयत्याने मारुन फिर्यादीचे १,५०,००० रुपये किंमतीचे नुकसान केले. पंकज पवार यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३२४(५) ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोबाईल हॅक करून तरुणाची दीड लाखांची ऑनलाईन फसवणूक

आरंभ मराठी | धाराशिव

तरुणाला व्हाट्सएपवर लिंक पाठवून आणि मोबाईल हॅक करून सायबर भामट्याने गोवर्धनवाडी येथील तरुणाची दीड लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी आदित्य पांडुरंग भालेराव (वय २३ वर्षे, रा. गोवर्धनवाडी ता. जि. धाराशिव) या तरुणाला दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आणि २० एप्रिल २०२५ रोजी मोबाईल फोनवर ८८३००४१५९३ या व्हॉटसअप क्रमांकावर मोबाईल क्रमांक ८७१४३६३६५७ च्या व्हॉटसअप वरुन लिंक पाठवण्यात आली. लिंक ओपन करताच मोबाईल हॅक करुन आदित्य भालेराव यांच्या महाराष्ट्र बँकेच्या अकाउंटमधून १,५०,००० रुपये काढून घेऊन अर्थिक फसणुक केली. आदित्य भालेराव यांनी दिनांक ४ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१८(४) सह ६६ (सी), ६६(डी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जीवे ठार मारण्याची धमकी देऊन तरुणीवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी | वाशी

तरुणीला जीवे ठार मारण्याची धमकी देऊन लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना वाशी तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. यासंबंधीची सविस्तर वृत्त असे की, एका गावातील २३ वर्षीय मुलगी (नाव– गाव गोपनीय) ही दिनांक २९ जून रोजी दुपारी बारा वाजता घरी असताना एका गावातील तरुणाने तिच्या घरी जाऊन बळजबरीने तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच दिनांक २ जुलै रोजी त्याच तरुणाने त्या तरुणीला दुसऱ्या गावी घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. याबद्दल कोणाला काही सांगीतले तर जिवे ठार मारीन अशी त्याने धमकी दिली. दिनांक ४ जुलै रोजी पीडित तरुणीने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–६४(२),(एम), ११५(२), ३५१(२), ३३३,सह अ.जा.ज. अ. प्र.का. कलम ३(१)(आर)(एस), ३(१) ३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे

# ठाकरे बंधू मराठीच्या मुद्द्यावर एकत्र

## कळंबमध्ये शिवसैनिक-मनसैनिकांचा जल्लोष

आरंभ मराठी | कळंब

मराठी भाषेवर लादली जाणारी हिंदीसक्ती अखेर राज्य सरकारला मागे घ्यावी लागली. या निर्णायक विजयाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी विजयी मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र येत मराठी जनतेला एक सामर्थ्यशील संदेश दिला. या ऐतिहासिक क्षणाचा आनंद व्यक्त करत कळंब तालुक्यात शिवसेना व मनसे कार्यकर्त्यांनी एकत्र येत जोरदार जल्लोष साजरा केला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतषबाजी आणि ''जय महाराष्ट्र'' च्या गर्जना करत मराठीच्या विजयाचा आनंद साजरा करण्यात आला. मराठीच्या अस्मितेसाठी राजकीय वैचारिक मतभेद बाजूला ठेवत एकत्र आलेले ठाकरे बंधू हे या पिढीसाठी प्रेरणास्थान ठरतील, असा विश्वास यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख सचिन काळे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात शिवसेना व मनसेचे स्थानिक नेते, पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रमुख उपस्थितांमध्ये शिवसेना तालुका प्रमुख सचिन काळे, उपजिल्हा प्रमुख प्रदीप मेटे, दिलीप पाटील, निवडणूक प्रमुख संजय मुंदडा, गोपाळ घोगरे, विश्वजित जाधव, शाम खबाले, सागर मुंडे, पंडीत देशमुख, मंदार मुळीक, शकिल काझी, संतोष लांडगे, गोविंद चौधरी, डॉ. जोगदंड, समाधान बाराते, शशिकांत पाटील, शुभम करंजकर, बाळासाहेब कोल्हे, आश्रुबा बिक्कड, अक्षय बाराते, निखिल कापसे, राकेश जगताप, पुरुषोत्तम चाळक, बाळासाहेब गंभिरे, संजय भोसले, बिबिशन देशमुख, बिबिशन गायकवाड, कल्याण गुरसाळे, सुलेमान मिर्झा, निर्भय घुले, सागर शिगणापुरे, हर्षवर्धन पाटील, बंडू यादव, अफसर पठाण, संतोष पवार, अनंत अंबिरकर, सुरज सातव, महादेव अंबिरकर, मनोज चोंदे, भरत शिंदे, यांच्यासह शेकडो शिवसैनिक –मनसैनिकांचा समावेश होता.




## तांदुळवाडीत शेतकऱ्यांना मारहाण करणाऱ्या पोलिसांची महानिरीक्षकांकडून चौकशी

### आमदार कैलास पाटील यांच्या लक्षवेधीनंतर राज्यमंत्री भोयर यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

पवनचक्की कंपन्यांसाठी वाशी तालुक्यातील तांदुळवाडी येथील शेतकऱ्यांना लाठ्याकाठ्याने तसेच उसाने मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचारी– अधिकाऱ्यांची पोलीस महानिरीक्षकांमार्फत चौकशी करण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानसभेतील आमदार कैलास पाटील यांनी यासंदर्भात लक्षवेधीद्वारे मुद्दा मांडला होता. त्यावर उत्तर देताना सरकारच्या वतीने राज्यमंत्री भोयर उपरोक्त माहिती सभागृहाला दिली.

गेल्या आठवड्यात आमदार कैलास पाटील यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करून शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या पोलिसांचे काय करणार, असा सवाल सरकारला केला.आमदार पाटील म्हणाले की, तांदूळवाडी गावामध्ये एका शेतकऱ्यांने दोन कंपनींना जमीन दिली. त्यात एक कंपनी एक रक्कम देते व दुसरी त्याहून कीतीतरी कमी देत असताना या शेतकऱ्यांने दोन्ही रक्कम सारखीच असावी अशी मागणी करतो तेव्हा कंपनीकडून दमदाटी करण्यात येते. शिवाय पोलीस प्रशासन त्या शेतकऱ्यांना शेतात येऊन पीकविलेल्या ऊसाने त्यांना मारहाण करतात. एवढ्यावर ते शांत बसले नाहीत तर त्या शेतकऱ्यांस पोलीस ठाण्यात डांबून ठेवतात व पुढील कार्यवाही करण्यासाठी कंपनीस मुभा देतात. मग नेमक पोलीस प्रशासन कोणासाठी काम करत आहे, याचे उत्तर सरकारने द्यावे, असा थेट सवाल सभागृहात केला. खोटे दस्त तयार करून बनावट सह्या करून शेतकऱ्यांची फसवणूक हे कंपनीचे लोक करत आहेत. तक्रार देऊनही त्यांच्यावर साधा गुन्हा दाखल का होत नाही, असा सवाल आमदार पाटील यांनी सरकारला विचारला. एवढेच नाही तर कंपनीकडून काही शेतकऱ्यांना धनादेश देऊ केले जातात व शेतात संपूर्ण काम देखील करतात व नंतर धनादेश बाऊन्स होण्याचे प्रकार घडले आहेत.



कंपनीवाले पुन्हा काही कारण सांगतात किंवा फोन उचलत नाहीत. तेव्हाही शेतकऱ्यांना पोलिसांकडून कसलीच दाद मिळत नाही, अशी माहिती आमदार पाटील यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवली. यावर मंत्री पंकज भोयर यांनी सांगितले की, याबाबत पोलीस महानिरीक्षक यांच्याकडून चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. तेव्हा आमदार अमित देशमुख यांनी कंपनीचे, पोलीस अधिकारी व शेतकरी यांची नावे सभागृहासमोर ठेवण्यास सांगितले.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय रविवार, दि. 6 जुलै 2025

पंढरीची वारी

# पंढरीची वारी, चुकू न दे हरी..!

दहावी अथवा बारावीची परीक्षा नापास होणाऱ्यांसाठी मार्चनंतर ऑक्टोबरची परीक्षा देता येत असे. त्यातही फेल झाल्यास पुन्हा मार्चला बसावं लागायचं. मग अशा एकाम ागून एक परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याला लोक 'आमक्या आमक्याची ऑक्टोबर–मार्चची वारी सुरू आहे!' असं म्हणून चिडवायचे. तो बिचारा तोंड लपवून फिरायचा. अशा रीतीने शैक्षणिक क्षेत्रात 'वारी' ची संकल्पना चुकीच्या पद्धतीने वापरल्यामुळे मी त्याकाळी वारी या शब्दाला काहीसा बिचकत होतो. नंतर जेव्हा आषाढी, चैत्र, कार्तिकी,म ाघ या वारी सोहळ्याची माहिती मिळू लागली,तसतसं वारीचं अस्सल रूप माझ्या ध्यानात येऊ लागलं.

तेव्हा वाटायचे एवढे लाखो लोक पूर्ण एक म हिना असे त्याग पूर्ण जीवन जगून स्वतःला पीडा का देत असतील? वाहतुकीच्या साऱ्या सुविधा असतानाही ३०० ते ४०० किलोमीटर पायी चालत पंढरपूरला येऊन, श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन त्या बदल्यात काय मागत असतील ? मग समजलं काहीतरी मागणं मागणे हा भाव वारीत नसतोच.मुक्ती मिळवणे असाही काही अलौकिक भाव या वारीत नसतो. लोक पंढरपूरच्या दिशेने मुक्काम दर मुक्काम करीत येत असतात ते अंतरंगातील अहंकार, लोभ, मोह, क्रोध यांच्या पाशाचे एकेक पदर वा बंध सोडवण्यासाठी.आणि एकच मागणं मागतात ते म्हणजे प्रेम!

वारी हे मराठी सांस्कृतिक परंपरेचे वैभव आहे. असा अनुपम सोहळा जगाच्या पाठीवर कुठेही दिसत नाही. 'वारी' हा भक्तीचा सोहळा आहे. आनंदाचा मेळा आहे. वारीची ही परंपरा गेले कित्येक वर्ष सुरू आहे. किती आले आणि गेले त्यामध्ये खंड पडला नाही. ही परंपरा पुढे देखील अशीच चालू राहणार आहे. हा सोहळा घडतो तर कसा?

संपदा सोहळा। नावडे मनाला।।
लागला टकळा। पंढरीचा।।
जावे पंढरीसी। आवडी मनासी।।
कई एकादशी। आषाढी ये।।

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगास शिरसावध्य मानून लाखो धवलवस्त्राधरी वारकरी पंढरीची वाट धरतात. गरीब –श्रीमंत, जाती–पाती यांसारख्या भेदांच्या पलीकडील समतेची शिकवण



प्रत्यक्ष आपल्या कृतीतून देत ही वारी सुरू होते .समस्त भाविक लौकिक जीवनातील ओळख विसरून फक्त 'वारकरी' म्हणून वारीमध्ये सहभागी होतात. विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी चालणे, देहभान हरपून नाचणे,फुगड्या खेळणे, तसेच एकत्र भोजन, सायंकाळी भजन आणि कीर्तन यामधून मिळणारा निर्भेळ असा आनंद वारीमधून ते मिळवतात .वारीमध्ये वारकरी एकमेकांच्या पाया पडतात. यामधून मानवी मनातील अहंकार नावाचा दोष नष्ट होतो.

महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्र या प्रांतात यादवकालापासून जे संप्रदाय उपासना मार्ग चालू आहेत. त्यामधील वारकरी संप्रदाय हा सर्वात प्राचीन असा आहे. म्हणून त्याला 'आदी संप्रदाय' म्हटले आहे. वारी परंपरेचा शोध घेतल्यास श्री ज्ञानेश्वर माऊलींनी साडेसातशे वर्षांपूर्वी स्वतः ज्येष्ठ वद्य अष्टमीला,'माझ्या जीवाची आवडी पंढरपुरा नेईन गुढी', असे म्हणत पंढरपुरात प्रस्थान केले होते. त्यापूर्वीही वारीची परंपरा अस्तित्वात होती. शिलालेख –ताम्रपटातून वारी परंपरा श्री विठ्ठल मंदिर, यावर संशोधन झाले आहे .पंढरपुरात आतापर्यंत जे शिलालेख उपलब्ध झालेले आहेत त्यांमध्ये शके ११५९ (इ. स. १२३७) होयसाळ राजाच्या कारकिर्दीतील शिलालेख आहे. तो सोळा खांबी मंडपाच्या तुळईवर तिन्ही बाजूने लिहिलेला आहे. तो संस्कृत आणि कानडी अशा संमिश्र भाषेत, देवनागरीलिपीत आहे. त्याच्यात पुंडलीक मुनींचा व विद्ठल देवाचा उल्लेख आहे. तसेच वारीचाही उल्लेख आहे. पंढरीच्या वारीचा हा सर्वात प्राचीन उल्लेख होय. तसाच दुसरा महत्त्वाचा शिलालेख शके ११९५ (सन १२७३)मधील, याला 'चौऱ्यांशीचा शिलालेख' म्हणतात. या शिलालेखात पंढरपुरास 'फागनीपूर' व विठोबास 'विठ्ठल' असे म्हटले आहे. याच्यात रामचंद्रदेव यादवाचा उल्लेख आहे. त्यात त्यांना 'पांढरीफडमुख्य' म्हणून संबोधले आहे.शालिवाहन शके १११० मधील एका प्राचीन शिलालेखात विठ्ठल देवाचा उल्लेख आलेला आहे. हा शिलालेख देऊळ बांधले याविषयी आहे.त्यात देवालय बांधणारांची नावे आलेली आहेत. त्याचबरोबर ताम्रपटांमध्ये पंढरपूरचे 'पांडुरंगपल्ली' असे नाव आहे.हा ताम्रपट शके ४३८म्हणजे इ. स. ५१६ चा आहे.पंढरी ह गाव शालीवाहन शकाच्या प्रारंभापासून वसलेला आहे. विठ्ठल मंदिर त्यावेळेपासून आहे.

पंढरीची वारी ही संत तुकाराम महाराजांच्या घराण्यात चालू होती.संत तुकाराम महाराज सांगतात –

पंढरीची वारी आहे माझे घरी।
आणिक न करी तीर्थव्रत।।
व्रत एकादशी करीन उपवासी।
गाईन अहर्निशी मुखी नाम।।
नाम विठोबाचे घेईन मी वाचे।
बीज कण्यांतीचे तुका म्हणे।।

श्री संत तुकाराम महाराज ह चौदाशे टाळकऱ्यांसह आषाढी वारीला श्री क्षेत्र देहू गावाहून श्री क्षेत्र पंढरपूरला प्रतिवर्षी जात असत. महाराजांच्या प्रयाणानंतर हा दिंडी सोहळा त्यांचे बंधू कान्होबा यांनी चालवला.कान्होबांच्या निधनानंतर संत तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण बाबांनी याला पालखी सोहळ्याचे रूप दिले. ज्याप्रमाणे भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्याची पूजा करून राज्यकारभार केला.त्याचप्रमाणे नारायण महाराजांनी श्री तुकोबांच्या आणि श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून पादुकासह 'ज्ञानोबा–तुकाराम' असे भजन करत पालखी सोहळा सुरू केला. ज्ञानोबा तुकोबा आपल्यासोबत आहेत त्यांच्या समागामे आपण पंढरपूरला चाललो आहोत अशी वारकऱ्यांची धारणा असते. १८३१ च्या पुढे आळंदीहून ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा स्वतंत्र सोहळा हैबतबाबा आरफळकर यांनी सुरू केला. त्याचबरोबर वारकऱ्यांची फड ही संस्था तेराव्या शतकापूर्वीची आहे.

महाराष्ट्राच्या कोकण, विदर्भ, मराठवाडा, खानदेश अशा सर्व कानाकोपऱ्यांतून अनेक संतांच्या नावे अनेक पालख्या आषाढी वारीस पंढरपूरला येतात. या पालख्यांची संख्या नेहमी वाढत जात आहे . सध्या २५० ते ३०० पालख्या येतात. या पालख्यांसमवेत एकूण सुमारे ४ ते ५ लाख वारकरी पायी पंढरपूरला येत असतात. आणि हे पालखी सोहळे गेली अनेक वर्षे सातत्याने येत आहेत. हे सातत्य, हा नियमितपणा म्हणजेच 'वारी'. संत एकनाथ महाराज ( पैठण, औरंगाबाद )संत निवृत्ती म हाराज ( त्र्यंबकेश्वर, नाशिक )संत चांगाटेश्वर महाराज ( सासवड, पुणे )संत सोपानदेव महाराज ( सासवड, पुणे ) संत मुक्ताबाई ( मुक्ताईनगर, जळगाव )रुक्मिणी माता ( कौडन्यपूर, अमरावती )संत तुकाराम महाराज ( देहू, पुणे )संत ज्ञानेश्वर महाराज ( आळंदी, पुणे )संत नामदेव महाराज ( पंढरपूर, सोलापूर ) संत निळोबाराय महाराज ( पिंपळनेर,अहमदनगर) श्री गुरु जनार्दन स्वामी ( दौलताबाद छ. संभाजीनगर ) श्री गुरु बाबाजी चैतन्य महाराज ( ओतूर, जुन्नर,पुणे ), संत गजानन महाराज( शेगाव, बुलढाणा) या संतांच्या पालख्या श्री क्षेत्र पंढरपूरला दरवर्षी आषाढी यात्रेला येतात. याचबरोबर लहान मोठ्या पालख्याची संख्या फार मोठी आहे.

जीवनात येऊन एक तरी आषाढी वारी केली पाहिजे. मनातील मळभ दूर होण्यासाठी,काही काळासाठी का होईना माणसाने संसारिक जीवनाचा त्याग केला पाहिजे. स्वतःचे शरीर स्वच्छ करण्यासाठी दररोज स्नान करणारा माणूस अंतर्मनाच्या स्वच्छतेसाठी वेळ देतो नाही.म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात...

नाहीं निर्मळ जीवन ।
काय करील साबण ।।
तैसे चित्तशुद्धी नाहीं ।
तेथें बोध करील काई ।।

चित्त शुद्ध होण्यासाठी रोजच्या धकाधकीच्या जीवनातून अलिप्त होऊन स्वतःचा शोध घेण्यासाठी ,संसारीक माणसाची जीवनात एकदा तरी पंढरीची वारी घडली पाहिजे.



किशोर जाधव,
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# व्रतांचे सारः एकादशी

एकादशी हिंदू धर्मात पाळली जाणारी एक पवित्र अशी तिथी आहे. ही तिथी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्ष या दोन्ही पंधरवाड्यात येते. त्यामुळे वर्षात एकूण चोवीस एकादशी व्रतांचे सार: एकादशी व्रत –एकादशी हिंदू धर्मात पाळली जाणारी एक पवित्र अशी तिथी आहे. ही तिथी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्ष या दोन्ही पंधरवाड्यात येते. त्यामुळे वर्षात एकूण चोवीस एकादशी येतात, तर हिंदू लीप वर्षात (अधिक मासात) दोन अतिरिक्त एकादशी सुद्धा येतात. प्रत्येक पंधरवाडी एकादशीला विशेष असे महत्त्व आहे. त्याची नावे सुद्धा भिन्नभिन्न आहे. आषाढ मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. प्रत्येक एकादशी तिथी ही भगवान श्रीहरी विष्णूंना समर्पित आहे. या दिवशी भगवान विष्णूची मनोभावे पूजा आणि उपासना केली जाते. एकादशीला उपवास केल्याने मन आणि शारीरिक इंद्रियांवर नियंत्रण मिळते. तसेच आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने एकादशीच्या व्रताकडे बघितले जाते. पुराणानुसार पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदूमान्य यांनी तप करून शंकराला प्रसन्न केले व अमरपद मिळविले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, शिव, विष्णू या देवावर अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकूट पर्वतावर आवळी (धात्री) या वृक्षातळी गुहेत दडून बसले. त्यांना आषाढी एकादशीचा उपवास करावा लागला. जोरदार पाऊस झाला, त्या पर्जन्यधारीत त्यांचे स्नान झाले. अकस्मात त्यांच्या श्वासातून एक शक्ती निर्माण झाली. गुहेच्या दारात बसलेल्या मृदुमान्य दानवाला ठार मारले. ही जी शक्तीदेवी तीच 'एकादशी' देवता होय. आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. या दिवशी श्री विठ्ठलाच्या रूपाने भगवान श्री विष्णूची पूजा केली जाते. पुढील चार महिने कार्तिकी एकादशी पर्यंत भगवान श्रीहरी विष्णू क्षीरसागरात(विश्वसागरात) शेषनागावर योगनिद्रेला जातात. म्हणून तिला 'देवशयनी एकादशी' असे नाव देण्यात आले आहे.या दिवसापासून चातुर्मासास प्रारंभ होतो. या दिवशी उपवास, पूजा अर्चा केल्याने भगवान श्रीहरी विष्णू प्रसन्न होतात.एकंदरीत देवशयनी आषाढी एकादशी धार्मिक आणि अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला विशेष असे महत्त्व असून मोठी एकादशी म्हणून ओळखले जाते. एकादशी व्रत करण्याचे काही नियम आहेत. एकादशी व्रत करण्याच्या आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त राहावे. एकादशीच्या दिवशी प्रातः स्नान करावे. तुळशी अर्पण करून श्रीविष्णूची मनोभावे पूजा करावी. उपवास व्रताचे पालन करावे, असे या एकादशी व्रताबद्दल सांगितलेले आहे. आपल्या वारकरी संतांचा श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्यदिव्य असा असा सोहळा असतो. या व्रताचे पालन बहुसंख्येने महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मोठ्या श्रद्धेने व भक्ती भावाने केले जाते. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांनी या व्रताबद्दल एक आचारसंहिता अभंगातून साधकांना सांगितलेली आहे. ती पुढील प्रमाणे दशमी व्रताचा आरंभु दिंडी कीर्तन करा समारंभु तेणे हा तो स्वयंभू संतोष पावे एकादशी जागरणहरीपूजन नामसंकीर्तन द्वादशी क्षिरापती जाण वैष्णव जन सेविती ऐसे व्रत तीन दिन करी जो आदरे प्रेमपूर्ण एका जनार्दनी बंधन तया नाही सर्वथा असा असा एका व्रताचा महिमा अनेक संतांनी गायला आहे. पवित्र पावन एकादशी व्रत देवांनी सुद्धा आचरले आहे. म्हणून आपले वारकरी संत सुद्धा इतर साधकांना सुद्धा एकादशी व्रत आचरणाचा आग्रह करतात. संत तुकाराम एका अभंगातून म्हणतात.

'' ज्यासी नावडे एकादशी जीताची नरकवासी
ज्यासी नावडे हे व्रत त्यासी नरक तोही भीत
ज्यासी घडे एकादशी जाणे लागे विष्णुपाशी
तुका म्हणे पुण्यराशी तोचि करी एकादशी

आपल्या अनेक वारकरी संतांनी मानव जन्म लाभल्याबद्दल वारंवार श्री विठ्ठलाचे आभार व्यक्त केले आहे. व ती स्वतःला भाग्यवान समजतात की, जन्मोजन्मीचे बहु पुण्य आहे, तेव्हा आपल्याला हे व्रत आचरण्याची भाग्य लाभले व पंढरीची वारी घडली. तर वारंवार श्री विठलाची सेवा घडण्याकरिता पुन्हा.. पुन्हा.. मानव जन्म मागतात.

'' तरीच जन्मा यावे दास विठोबाचे व्हावे

श्री विठ्ठलाचे सख्य असलेले पंढरपूर निवासी संत नामदेव म हाराज श्री विठ्ठलाशी हितगुज करताना एका अभंगात म्हणतात.

' आषाढी कार्तिकी विसरुं नका मज सांगतसे गुज पांडुरंग

साक्षात पांडुरंग परमात्मा नामदेवांशी हितगुज करताना म्हणतात. आषाढी कार्तिकीच्या या सोहळ्यात मला विसरू नका. ज्याप्रमाणे भक्तांना विठुरायाच्या भेटीची ओढ असते. तशीच तळमळ आणि ओढ भगवंताला सुद्धा भक्तांच्या भेटीची असते. हे नामदेवरायांच्या अभंगाच्या प्रमाणानुसार येतात, तर हिंदू लीप वर्षात (अधिक मासात) दोन अतिरिक्त एकादशी सुद्धा येतात. प्रत्येक पंधरवाडी एकादशीला विशेष असे महत्त्व आहे. त्याची नावे सुद्धा भिन्नभिन्न आहे. आषाढ मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात.

प्रत्येक एकादशी तिथी ही भगवान श्रीहरी विष्णूंना समर्पित आहे. या दिवशी भगवान विष्णूची मनोभावे पूजा आणि उपासना केली जाते. एकादशीला उपवास केल्याने मन आणि शारीरिक इंद्रियांवर नियंत्रण मिळते. तसेच आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने एकादशीच्या व्रताकडे बघितले जाते. पुराणानुसार पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदूमान्य यांनी तप करून शंकराला प्रसन्न केले व अमरपद मिळविले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, शिव, विष्णू या देवावर अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकूट पर्वतावर आवळी (धात्री) या वृक्षातळी गुहेत दडून बसले. त्यांना आषाढी एकादशीचा उपवास करावा लागला. जोरदार पाऊस झाला, त्या पर्जन्यधारीत त्यांचे स्नान झाले. अकस्मात त्यांच्या श्वासातून एक शक्ती निर्माण झाली. गुहेच्या दारात बसलेल्या मृदुमान्य दानवाला ठार मारले. ही जी शक्तीदेवी तीच 'एकादशी' देवता होय. आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. या दिवशी श्री विठ्ठलाच्या रूपाने भगवान श्री विष्णूची पूजा केली जाते. पुढील चार महिने कार्तिकी एकादशी पर्यंत भगवान श्रीहरी विष्णू क्षीरसागरात(विश्वसागरात) शेषनागावर योगनिद्रेला जातात. म्हणून तिला 'देवशयनी एकादशी' असे नाव देण्यात आले आहे.या दिवसापासून चातुर्मासास प्रारंभ होतो. या दिवशी उपवास, पूजा अर्चा केल्याने भगवान श्रीहरी विष्णू प्रसन्न होतात. एकंदरीत देवशयनी आषाढी एकादशी धार्मिक आणि अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला विशेष असे महत्त्व असून मोठी एकादशी म्हणून ओळखले जाते. एकादशी व्रत करण्याचे काही नियम आहेत. एकादशी व्रत करण्याच्या आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त राहावे. एकादशीच्या दिवशी प्रातः स्नान करावे. तुळशी अर्पण करून श्रीविष्णूची मनोभावे पूजा करावी. उपवास व्रताचे पालन करावे, असे या एकादशी व्रताबद्दल सांगितलेले आहे. आपल्या वारकरी संतांचा श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्यदिव्य असा असा सोहळा असतो. या व्रताचे पालन बहुसंख्येने महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मोठ्या श्रद्धेने व भक्ती भावाने केले जाते. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांनी या व्रताबद्दल एक आचारसंहिता अभंगातून साधकांना सांगितलेली आहे. ती पुढील प्रमाणे..

''दशमी व्रताचा आरंभु दिंडी कीर्तन करा समारंभु
तेणे हा तो स्वयंभू संतोष पावे
एकादशी जागरणहरीपूजन नामसंकीर्तन
द्वादशी क्षिरापती जाण वैष्णव जन सेविती
ऐसे व्रत तीन दिन करी जो आदरे प्रेमपूर्ण
एका जनार्दनी बंधन तया नाही सर्वथा ''

असा असा एका व्रताचा महिमा अनेक संतांनी गायला आहे. पवित्र पावन एकादशी व्रत देवांनी सुद्धा आचरले आहे. म्हणून आपले वारकरी संत सुद्धा इतर साधकांना सुद्धा एकादशी व्रत आचरणाचा आग्रह करतात. संत तुकाराम एका अभंगातून म्हणतात.

ज्यासी नावडे एकादशी जीताची नरकवासी
ज्यासी नावडे हे व्रत त्यासी नरक तोही भीत
ज्यासी घडे एकादशी जाणे लागे विष्णुपाशी
तुका म्हणे पुण्यराशी तोचि करी एकादशी ''

आपल्या अनेक वारकरी संतांनी मानव जन्म लाभल्याबद्दल वारंवार श्री विठ्ठलाचे आभार व्यक्त केले आहे. व ती स्वतःला भाग्यवान समजतात की, जन्मोजन्मीचे बहु पुण्य आहे, तेव्हा आपल्याला हे व्रत आचरण्याची भाग्य लाभले व पंढरीची वारी घडली. तर वारंवार श्री विठलाची सेवा घडण्याकरिता पुन्हा.. पुन्हा.. मानव जन्म मागतात.

तरीच जन्मा यावे दास विठोबाचे व्हावे ''

श्री विठ्ठलाचे सख्य असलेले पंढरपूर निवासी संत नामदेव महाराज श्री विठ्ठलाशी हितगुज करताना एका अभंगात म्हणतात.

'' आषाढी कार्तिकी विसरुं नका मज सांगतसे गुज पांडुरंग


साक्षात पांडुरंग परमात्मा नामदेवांशी हितगुज करताना म्हणतात. आषाढी कार्तिकीच्या या सोहळ्यात मला विसरू नका. ज्याप्रमाणे भक्तांना विठुरायाच्या भेटीची ओढ असते. तशीच तळमळ आणि ओढ भगवंताला सुद्धा भक्तांच्या भेटीची असते. हे नामदेवरायांच्या अभंगाच्या प्रमाणानुसार सिद्धच होते.




शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# पंडिता रमाबाई यांचे ओघवते चरित्र

अनुपमा उजगरे यांनी स्मृतिशेष विदुषी पंडिता रमाबाई सरस्वती यांचे 'साहित्य अकादमी'च्या 'भारतीय साहित्याचे निर्माते' या ग्रंथमालेंतर्गत अतिशय ओघवत्या भाषेत सुंदर चरित्र लिहिले आहे.या पुस्तकामुळे पंडिता रमाबाई कोण होत्या,त्यांचे कार्यकर्तृत्व काय होते,त्यांनी केलेला अथक सामाजिक संघर्ष,त्यांनी भारतीय आणि मराठी समाजाला दिलेले योगदान अशा अनेक बाबींची सविस्तर चर्चा वाचकांपुढे येते.समाजघडण्याची प्रक्रिया संथपणे सुरु असते,त्यासाठी पंडिता रमाबाईंसारख्या कणखर, कर्तबगार आणि उच्चविद्याविभूषित महिलांचे योगदान सुद्धा महत्त्वाचे ठरत आलेले असते.अनेक बुरसटलेल्या रुढीपरंपरांना डावलून,बंद करुन समाजसुधारणा राबवताना येणाऱ्या अनंत अडचणी व अडथळे रमाबाईंनाही आल्या पण त्यावर मात करीत त्यांनी स्त्रियांसाठीच्या शिक्षण,स्वावलंबन आणि स्वयंरोजगाराच्या वाटा कशा सुकर केल्या यावर या पुस्तकामधून चांगला प्रकाश टाकण्यात आला आहे. या चरित्राचे ढोबळ मानाने तीन भाग करण्यात आलेत. पूर्वार्ध,मध्यान्ह आणि उत्तरार्ध असे प्रमुख तीन भाग रम ाबाई यांच्या चरित्रावर केंद्रीत असल्यातरी संपूर्ण पुस्तक हे एकूण नऊ भागात लिहिण्यात आले आहे.त्यात वेगवेगळ्या आवश्यक सूचींचा समावेश आहे,अखेरीस परिशिष्टेही दिली आहेत.सुची आणि परिशिष्टे यांमुळे रमाबाईंवर अभ्यास करु इच्छिणाऱ्या विद्यार्थी,अभ्यासकांची चांगली सोय झाली आहे. त्यांच्यावरील विविध भाषांमधून लिहिण्यात आलेल्या ग्रंथांची सविस्तर सूचीही इथे उपलब्ध आहे.पूर्वार्ध या पहिल्या भागातून आपल्याला रमाबाई यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी स्पष्ट होते.चित्पावन ब्राह्मण समाजाच्या संस्कृत अभ्यासक आणि पंडिती घराण्याचा वारसा रमाबाईंना लाभला होता.कर्नाटक राज्यातील त्यावेळच्या म्हैसूर संस्थानापासून ते पुण्यातील पेशवाईपर्यंतचा आणि पुढचा त्या घराण्याचा जीवनप्रवास व पुढे त्या घराण्यात जन्म झालेल्या रमाबाई यांची ही चरित्रगाथा वाचताना मन रंगून जाते.संस्कृत आणि धर्मशास्त्राचे पंडित असलेले वडिल अनंतशास्त्री जे स्त्रियांना वेदपठणाचा आणि




शिक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी कमालीचे आग्रही होते तसेच त्यासाठी धर्ममार्तंडांशी त्यांचे वादविवादही झडले,पण शेवटी त्यात रमाबाईंचे वडिलच जिंकले,अशाप्रकारे त्या काळातदेखील समाजसुधारणेचा प्रयत्न प्रगतीशील विचारांच्या अशा मंडळींकडून सुरु होता.छोट्या रमावर आईचे संस्कार होते.त्यातूनच पंडिता रमाबाई यांची जडणघडण झाली होती. आई हीच रमाबाईंची खरी गुरु होती.शिक्षणाच्या आवडीची बीजं आईमुळेच रमाबाईंच्या मनात रुजली होती.पुढे म ातापित्यांच्या निधनानंतर रमा आणि भाऊ श्रीनिवास यांनी उत्तर भारतात चार वर्षांची प्रदीर्घ पायी भ्रमंती केली.त्यांनी काश्मीर गाठले.अनेक तीर्थस्थळांचे दर्शन घेतले,हा सगळा प्रवास सुमारे चार हजार मैलांचा होता.आईबापांविना कोवळ्या वयात पोरके झालेल्या या बहिणभावांनी अनेक हालअपेष्टा सोसत पडेल ती कामे करीत हा कठिण प्रवास केला होता. असंख्य कडूगोड अनुभव घेत १८७८ साली दोघे कलकत्ता शहरात पोहोचले.या अवाढव्य शहराच्या तत्कालीन सामाजिक स्थितीविषयी प्रबोधनकार ठाकरे यांनी काय लिहिले होते याचा उल्लेख या पुस्तकात आहे,'प्राचीन मनुस्मृतीतील दंडकावर डोळे मिटून विश्वासाने आचारविचार करणारे लाखो लोक ह्या शहरात होते. तसेच तसल्या धर्माचरणात मनाला शांती नाही,माणुसकीला वाव नाही, स्त्रियांच्या उद्धाराला कोठेच वाव नाही,असल्या पोथी,भिक्षुक पूजक धर्माच्या नादाने पुरोगामी जमान्यात हिंदुजनांना कोठेही टिकाव धरता येणार नाही म्हणून त्यातला वाईट भाग कापून काढून चांगल्याचा तेवढा पुरस्कार करावा, अशा विचारांनी थरारलेले शेकडो पंडितही होते.'यावरुन त्याकाळात तत्कालीन बंगालात हिंदूधर्माविषयी प्रबोधनाची चळवळ जोरात सुरु होती हे स्पष्ट होते.अशा काळात रमा आणि त्यांचा भाऊ श्रीनिवास कलकत्यात दाखल झाले होते.संस्कृतभाषेतल्या प्रकांड पंडित असलेल्या रमाबाईंचे कलकत्ताशहरातील विद्वानांपुढे फर्ड्या संस्कृतमधून झालेले भाषण,संवाद हा त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाराच ठरला.




पुढे त्या प्रसंगामुळे त्यांचा अनेकांकडून सन्मान घडू लागला. संस्कृतभाषेवर कमालीचे प्रभुत्व असलेल्या एका कुमारवयीन विदुषीची किर्ती बंगालबरोबरच संपूर्ण भारतात पसरायला लागली.ठिकठिकाणी त्यांचा उत्स्फुर्त सन्मान होऊ लागला.याच कालावधीत काही युरोपियन ख्रिस्ती लोकांशी रमाबाईंचा परिचय झाला,संवाद घडू लागला,विचारांची देवाणघेवाण सुरु झाली.यातूनच पुढे बिपिन बिहारी मेधावी दास या विद्वान आणि वकिली व्यवसाय करणाऱ्या गृहस्थाशी संपर्क आला.बिपिन बिहारी हे कवी आणि संगीतातील मर्मज्ञही होते.अशातच रमाचे बंधू श्रीनिवास याचा अकस्मात मृत्यू झाल्याने रमाबाई एकट्या पडल्या. म्हणूनच बावीस वर्षाच्या रमाबाईंनी १३ जून १८८० रोजी बांकीपूर येथील कोर्टात बिपिन बिहारी दास यांच्याशी रीतसर विवाह केला.पुढे सिलचर येथे वास्तव्यास असताना रमाबाईंनी बिपिनबाबूंच्या संग्रहातल्या ग्रंथांचे भरपूर वाचन केले.तिथेच बायबलचा भाग असलेल्या लूककृत शुभवर्तमान हे पुस्तक रमाबाईंच्या हाती लागले.१६ एप्रिल १८८१ ला या जोडप्यांच्या पोटी एका कन्येचा जन्म झाला,तिचे नाव मनोरमा असे ठेवण्यात आले होते. पुढे चार फेब्रुवारी १८८२ साली पती बिपिन दास यांच्या निधनानंतर रमाबाई या महाराष्ट्रकन्येला मराठी मुलूखात परतण्याचे वेध लागले.महाराष्ट्रातही त्याकाळी समाजसुधारनेचे वारे वाहायला सुरुवात झाली होती.स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठीठोस कार्य करण्याच्या विचाराने रमाबाई कार्यरत झाल्या.मध्यान्ह या पुस्तकाच्या दूसऱ्या भागामधून उजगरे यांनी पंडिता रमाबाई यांच्या सामाजिक चळवळींवर विस्तृत प्रकाशझोत टाकला आहे.आर्य महिला समाज या संस्थेच्या माध्यमातून रमाबाईंनी महाराष्ट्रातील शहरे आणि गावे पिंजून काढण्यास सुरुवात केली.महिलांचे प्रबोधन करायला लागल्या.मुंबई–पुणे या शहरात तसेच अहमद नगर सोलापूर–बार्शी अशा ठिकाणीसुद्धा निमंत्रणावरून रमाबाई आपले विचार व्यक्त करीत होत्या.त्यातून पुढे त्यांनी ख्रिस्तीधर्माचा स्वेच्छेने अवलंब केला व त्या भारतात परतल्या. पण महाराष्ट्रात त्यांच्या या धर्मपरिवर्तनाच्या निर्णयावर अनेक कडवट प्रतिक्रिया उमटल्या.पण कुठल्याही टीकांना न जुमानता रमाबाईप आपल्या समाजसुधारणांच्या उद्दीष्टांवर ठाम होत्या.त्यातूनच त्यांनी मुली आणि स्त्रियांसाठी वसतीगृहे व शिक्षण यांची सोय केली. 'शारदासदन' संस्था उभारली, यात सर्व धर्म आणि जातीतील विधवा स्त्रिया,मुली यांना आसरा दिला.पंडिता रमाबाई या पुस्तकाम धून आपल्याला धर्मपरायण तशाच समाजसुधारणा करण्यावर ठाम असलेल्या एका विदुषीच्या संघर्षमय जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्राला आणि मराठी जनांना प्रेरणास्पद ठरेल असेच अनुपमा उजगरे यांनी लिहिलेले 'पंडिता रमाबाई' हे चरित्र आहे.



भरत यादव
yadavbh515@gmail.com
9890140500

पुस्तकाचे नावः पंडिता रमाबाई
**लेखिकाः अनुपमा उजगरे**
प्रकाशकः साहित्य अकादमी
पृष्ठसंख्याः ९७
मूल्यः शंभर रुपये

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# टाळ मृदंगाच्या तालात पांगरदरवाडी दुमदूमली

## पांगरदवाडी शाळेतील बालवारकऱ्यांनी केले पालखी व दिंडी सोहळ्यातून जनप्रबोधन





**आरंभ मराठी | तामलवाडी**

''तुझिया नामाची शाळा भरली, पंढरी हसली गोड किती! माऊली माऊली शाळा गरजली!!'' असा विठुनामाचा गजर करत शनिवारी (दि.५) तुळजापूर तालुक्यातील पांगरदरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी सकाळी आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळ्याबरोबरच ग्रंथदिंडी व वृक्षदिंडी काढत ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी पालखीत श्री विठ्ठल-रखुमाईची प्रतिमा व शालेय अभ्यासक्रमाची पुस्तके ठेवण्यात आली होती. पंढरीची वारी ही ईश्वरी प्रेमाची एक विलक्षण अनुभूती आहे. वारी ही साधना असून दिंडी हे एक साधन आहे. सातत्य, नियमितपणा व सामूहिक भक्ती ही वारीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. शालेय विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारशाची जाण असावी त्याचबरोबर दिंडीतील सर्वांच्या सहभागातून धार्मिक सलोखा व धर्मनिरपेक्षता या संविधानात्मक तत्वांतून राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण व्हावी व त्यांच्यात अंगीभूत असणारी उपक्रमशीलता वाढीस लागावी या हेतूने आषाढी एकादशीनिमित्त या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पालखी सोहळ्याबरोबरच काढलेल्या ग्रंथदिंडीतून समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन कार्यकारणभाव वृद्धिंगत व्हावा तसेच पर्यावरणपूरक वृक्षदिंडीतून समाजाचे निसर्ग वाचविण्यासाठी उद्बोधन व्हावे, याकरिता या तीनही दिंड्या संयुक्तरीत्या काढत शाळेतील बालवारकरी यांनी अवघे गाव भक्तिमय व ज्ञानमय केले. शाळेपासून निघालेल्या या दिंडीत प्रारंभी भगवा ध्वज घेऊन नाचणारे बालवारकरी, नंतर टाळकरी, मध्येच मृदंगवादक, वीणेकरी, भजनी मंडळ व नंतर डोक्यावर ग्रंथ ,तुळशी व रोपे घेऊन आलेल्या बालमहिला वारकरींसह सर्व विद्यार्थी व शेवटी विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, संत गोरा कुंभार, बालशिवाजी यांच्या प्रतिरुपतील विद्यार्थ्यांचा शोभारथ 'विठूनामाचा'जयघोष करीत--- 'सोपे वर्म आम्हा सांगितले संती! टाळ दिंडी हाती घेऊनी नाचा!' या उक्ती प्रमाणे पाऊल खेळत गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापाशी हीं दिंडी स्थिरावली. यावेळी येथे शालेय विद्यार्थी, शिक्षक, भजनी मंडळ व गावातील काही महिलांनी अभंग, गवळण सादर करीत अवघा परिसर भक्तिमय केला. बालवारकऱ्यांच्या झिम्मा - फुगड्यांसोबत शाळेतील विद्यार्थ्यांनी मृदंगाच्या तालावर धरलेला फेर व फुगडी पाहून उपस्थितांनी दाद दिली. शेवटी 'अजि म्या देखिली पंढरी! नाचताती वारकरी, भार पताकांचे करी, भीमातीरी आनंद!' असे गात हीं दिंडी शाळेकडे मार्गस्थ झाली. या दिंडीसाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक यांचेसह शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभले. या दिंडीसोहळ्यासाठी शोभायात्रा रथ, ट्रॅक्टर, साऊंड सिस्टिम, पेहराव, केळी व साबुदाणा वाटप यांसाठी सरपंच सोमनाथ शिंदे, श्रीराम शेळके, आण्णा मोरे, आबाराव जाधव, दाजीबा मोरे यांनी आर्थिक सहाय्य केले.

# आषाढी एकादशीनिमित्त बालवारकऱ्यांची भक्तिमय दिंडी

## परंपरा जपत चिमुकल्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**आरंभ मराठी | तुळजापूर**

संत परंपरेचा ठसा उभ्या पिढीवर उमटवणारा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणारा आषाढी एकादशी निमित्तचा बाल वारकऱ्यांचा दिंडी सोहळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथे अत्यंत भक्तिमय व उत्साही वातावरणात पार पडला. पालखीचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक सोमदेव गोरे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यानंतर दिंडी मार्गस्थ झाली. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे लहानग्या चिमुकल्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा केली होती. इतर बाल वारकऱ्यांनी गळ्यात टाळ, हाती भगवी पताका, डोक्यावर तुळस व कलश घेत गावभर टाळ-मृदंगाच्या गजरात ''माऊली माऊली''ज्ञानोबा-तुकाराम'' अशा घोषणांनी सारा परिसर दुमदुमवला. मुलांनी पारंपारिक साजाच्या साड्या परिधान केल्या होत्या. मंदिरात दिंडी पोहचल्यावर माजी सैनिक मारुती पाटील व सुधीर पाटील यांच्या शुभहस्ते आरती करण्यात आली. यावेळी माजी सरपंच ज्ञानेश्वर माळी, उपसरपंच सुधीर पाटील, शिवदास पाटील , दत्तात्रय वडणे सुदर्शन पाटील यांच्या उपस्थितीत बाल वारकऱ्यांनी संतांच्या वेशभूषा केल्या. यावेळी बाल वारकऱ्यांनी ''झाडे लावा झाडे जगवा' व ''पाणी आडवा, पाणी जिरवा'' या सामाजिक विषयांवर भारूड सादर करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या छोट्यांच्या या जाणीवपूर्वक सादरीकरणाला ग्रामस्थांनी भरभरून दाद दिली.त्यानंतर रंगला फुगडीचा बहारदार खेळ. लहान मुला-मुलींनी महिला शिक्षिका व गावातील महिलांनीही फुगडीचा मनमुराद आनंद लुटला. ''विठुरायाची नगरी'रखुमाई रखुमाई' यां भक्तिगीतांवर पारंपरिक नृत्य सादर करून वातावरण भक्तिमय केले. या नृत्य व भक्तिरसाने भरलेल्या रिंगणानंतर विलास शिंदे, सुधीर पाटील, शिवदास पाटील व ज्ञानेश्वर माळी या भक्तांनी बाल वारकऱ्यांना खाऊ वाटप करून त्यांच्या आनंदात भर टाकली.या दिंडी सोहळ्याने विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील भावपूर्णता, भक्तिरसातील तल्लीनता आणि अनुशासित सहभाग गावकऱ्यांच्या मनाला भावला. या कार्यक्रमास गावातील महिला, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पालखी सोहळ्यासाठी सोमदेव गोरे , ज्ञानेश्वरी शिंदे , प्रणिता कांबळे , स्मिता पाटोळे , योगिता माने , अनुराधा पाटील , जयश्री राऊत , शिल्पा तांदळे , रूपाली सगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आषाढी एकादशीनिमित्त दारफळ येथे संस्काराची दिंडी उत्साहात

## विठ्ठलनामाचा गजर आणि पारंपरिक खेळांनी वातावरण भक्तिमय





**आरंभ मराठी | दारफळ**

दारफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व संत कोकणी बुवा वारकरी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली संस्कार दिंडी आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी (दि.५) उत्साहात व भक्तिरसात पार पडली. दिंडीची सुरुवात विठ्ठल-रुक्माई मूर्ती पूजन व पृथ्वी पूजनाने झाली. पूजन ह.भ.प. योगेश इंगळे महाराज (वारकरी शिक्षण संस्था), तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष धर्मराज जाधव, गावातील मान्यवर व शाळेचे मुख्याध्यापक बिभीषण पाटील यांच्या हस्ते पार पडले. यानंतर मृदंग-टाळांच्या गजरात, भगवा पताका, पालखी आणि विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग यासह दिंडीने गावात भ्रमण केले. विशेष म्हणजे, शाळेतील विद्यार्थी आणि वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी यांनी गावातील चौका-चौकामध्ये पारंपरिक फुगडी, विविध पारंपरिक खेळ, विठ्ठलनामाचा गजर, भजन, अभंगगायन आदी कार्यक्रमांचे सादरीकरण केले. या उपक्रमांनी दिंडीला एक वेगळेच सांस्कृतिक व भक्तिपर वातावरण प्राप्त झाले. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन शाळेतील शिक्षकांनी मनपूर्वक परिश्रम घेऊन केले. विजयकुमार पाटील, शिवाजी मर्फळे, बाबू सावंत, प्रदीप बोरके, शशिकला कापसे, रंजना करडे, भाग्यश्री योग्य, स्वाती बोडके या सर्व शिक्षकांनी समन्वय साधत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. गावकऱ्यांनीही दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. फुलांची उधळण, पाणपोई आणि अलंकरणाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# तेर येथील स्पेशल शाळेत आषाढी एकादशी व एक पेड माँ के नाम निमित्त वारकरी दिंडी



**आरंभ मराठी | तेर**

तेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळेत आषाढी एकादशी व एक पेड माँ के नाम या निमित्ताने वारकरी दिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध वारकरी वेशभूषामध्ये वेश परिधान करून गावकऱ्यांचे लक्ष वेधले. विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या जयघोषाने आणि झाडे लावा झाडे जगवा या उद्देशाने ही दिंडी काढण्यात आली. सर्व गावकरी लहान चिमुकल्यांचे मनापासून कौतुक करत होते. या दिंडीसाठी प्रभारी मुख्याध्यापक तानाजी मारवटकर, श्रीमती एम.एन शिंदे, श्रीमती जे.डी.देवारे, श्रीमती ए.ए.देशमुख, श्रीमती जे.आर. पाचभाई, श्रीमती के.एम. निकम, श्रीमती ए.बी. धुमाळ, एस.डी.नागलबोले, एस.एस.पवार ,.डी.ए. कांबळे या सर्वांनी चांगल्या पद्धतीने कार्य केले.

# श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजमध्ये युवक प्रशिक्षण मेळाव्याला प्रतिसाद





**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजमध्ये दिनांक ४ जुलै रोजी वाणिज्य विभागामध्ये आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त जिल्हा उपनिबंधक कार्यालय धाराशिव, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्या मार्फत युवक प्रशिक्षण मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य नन्नवरे सर व उपप्रचार्य एस. के. घार्गे सर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एन. आर. नन्नवरे यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देऊन सहकाराचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी विविध सहकारी संस्थांचा अभ्यास करावा असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डी. एस. जाधव साहेब, कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक कार्यालय सहकारी संस्था, धाराशिव यांनी महाराष्ट्रामध्ये सहकाराची सुरुवात कशाप्रकारे झाली व सहकाराचे महत्त्व विविध क्षेत्रांमध्ये कशाप्रकारे वाढत गेले याविषयी माहिती दिली. तसेच सहकारी बँकांचे कार्य व सेवा याबद्दलही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक एम. व्ही. शिंदे, अतुल कुलकर्णी, लेखाविभाग, जिल्हा उपनिबंधक कार्यालय सहकारी संस्था धाराशिव, मधुकर जाधव, जिल्हा सहकार विकास अधिकारी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे तसेच कॉलेजमधील प्राध्यापक एस. के. कापसे, सौ. एस. एल. जाधव, सौ. एस. शेळके, आर. एस. भोसले, एल. एस. शिंदे आणि वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षण मेळाव्यास आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्थेच्या सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य पाटील, प्रशासकिय अधिकारी एस. एस. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. एस. के. कापसे यांनी केले.

# आषाढी एकादशीनिमित्त नूतन विद्यामंदिरात टाळ-मृदंगाच्या गजरात पालखी मिरवणूक

**आरंभ मराठी | धाराशिव**



धाराशिव येथील नूतन प्राथमिक विद्यामंदिर येथे आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वारी परंपरेला साजेशी अशी टाळ-मृदुंगाच्या गजरात पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेची पूजा करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभंग गायन, हरिपाठ, तसेच संत चरित्रावर आधारित नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ''वारी आणि तिचा सामाजिक संदेश'' या विषयावर शिक्षकांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सर्व विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत भाग घेतला. ''ज्ञानोबा-तुकोबा''च्या घोषणांनी वातावरण भक्तिमय झाले. शेवटी सामूहिक आरती व प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले, तर सांस्कृतिक समितीने आयोजनात मोलाची भूमिका बजावली. शिक्षक व पालक यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिकच मंगलमय झाला.

# सिद्धीविनायक सोशल फाऊंडेशनतर्फे सहकारी संस्था कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान

**आरंभ मराठी | धाराशिव**



सहकार दिनाचे औचित्य साधून श्री. सिद्धीविनायक सोशल फाऊंडेशनच्या वतीने संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या संकल्पनेनुसार, धाराशिव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्याशी परिसंवाद करून त्यांचे सहकार क्षेत्रातील योगदान मान्य करण्यात आले. हा सन्मान कार्यक्रम जिल्ह्यात सहकार मूल्यांची रुजवणूक आणि सहकारी चळवळीला प्रशासनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या बळकटीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हा उपनिबंधक (सह. संस्था) पांडुरंग साठे, कार्यालय अधीक्षक डी. ए. जाधव, सहकार अधिकारी ए. आर. सय्यद, जिल्हा सह. विकास अधिकारी मधुकर जाधव, पर्यवेक्षक अतुल कुलकर्णी, वरिष्ठ लिपिक अतुल पवार, सांख्यिकी सहाय्यक अमोल कस्तुरे, मुख्य लिपिक सविता मोरे, वर्षा भोसले, सहाय्यक सहकार अधिकारी आशा कांबळे, सेवक सरस्वती मोटे, मेंगले संजय, दत्ता शिंदे आणि युवक प्रशिक्षणार्थी वैभव साळुंखे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी श्री. सिद्धीविनायक जिल्हा पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी देविदास कुलकर्णी, फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक गजानन पाटील, मार्केटिंग प्रमुख रामचंद्र सारडे, मल्टीस्टेट प्रशासन प्रमुख दिनेश इंगळे, आय.टी. प्रमुख प्रशांत वाघमारे, सेवक नागनाथ क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. सहकार क्षेत्रात नव्या पिढीला संधी मिळावी, सहकार चळवळीला गती मिळावी व सहकारी संस्था आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सक्षम बनाव्यात, या दृष्टीने दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे प्रयत्न असतात. त्यांनी नेहमीच सहकार क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन केले असून, सामाजिक बांधिलकीतून प्रेरित होऊन श्री. सिद्धीविनायक परिवार व सोशल फाऊंडेशन अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत आली आहे.

# लोहारा तालुक्यातील शेतकऱ्याला सौर व पवन ऊर्जा कंपनीकडून न्याय मिळणार

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या निवेदनाची मुख्यमंत्र्यांकडून दखल

**आरंभ मराठी | लोहारा**



लोहारा तालुक्यातील होळी येथील शेतकरी तुकाराम बिराजदार यांच्या जमिनीचा मोबदला न देता सौर व पवन ऊर्जा प्रकल्प उभारणाऱ्या कंपनीविरोधात अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने मंत्रालयातील ऊर्जा विभागाकडे चौकशीचे आदेश दिले आहेत. होळी येथील शेतकरी तुकाराम बिराजदार यांनी यापूर्वी कंपनी विरोधात तालुका व जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी अर्ज केला होता. मात्र, त्याला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी मागील आठवड्यात लोहारा तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. या वेळी त्यांना पाठिंबा देत अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे थेट ई-मेलद्वारे तक्रार दाखल केली होती. धाराशिव जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू असून, अनेक शेतकऱ्यांना नाममात्र मोबदला देऊन ३० वर्षांचे करारपत्र घेतले जात असल्याचा आरोप होत आहे. तसेच सामाजिक वनीकरण आणि पाटबंधारे विभागाच्या जमिनींवरही टॉवर व विद्युत वाहिन्या उभारल्या जात आहेत. या प्रकल्पात स्थानिकांना रोजगार मिळत नाही ही गंभीर बाबही जगताप यांनी निवेदनात नमूद केली होती. मुख्यमंत्री कार्यालयाकडून हे निवेदन ऊर्जा विभागाकडे पाठवण्यात आले असून चौकशीचे आदेशही दिले आहेत. त्यासोबतच संबंधित विभागाशी संपर्क करण्याची सूचना जगताप यांना करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याला मावेजा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जगताप यांच्या हस्तक्षेपामुळे शेतकऱ्याला न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांनी केलेल्या प्रयत्नाचे कौतुक होत आहे.

### शेतकऱ्यांवर अन्याय झाल्यास उभा राहणार



विकासाला आमचा विरोध नाही, मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शासकीय नियमांचा भंग होऊ नये यावर लक्ष द्यायला हवे. ज्या वेळेस कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर अन्याय होईल, त्या वेळेस शेतकऱ्यांची बाजू घेऊन मी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार.

अनिल जगताप


सामाजिक कार्यकर्ते.

# शारीरिक-मानसिक त्रासाला कंटाळून वृद्ध महिलेची आत्महत्या, सात जणांवर गुन्हा दाखल

**आरंभ मराठी | मुरूम**

कुटुंबातील मुलगा, सून आणि इतर नातेवाईकांना एका भांडणात इतर लोकांनी मारहाण करून त्रास दिल्यामुळे वृद्ध महिलेने आत्महत्या केल्याची घटना लोहारा तालुक्यातील आष्टाकासार तांडा येथे घडली. याप्रकरणी सात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, मयत रमणाबाई दासु चव्हाण (वय ७५ वर्षे, रा. आष्टाकासार तांडा ता. लोहारा) यांनी दिनांक ३० जून रोजी त्यांच्या राहत्या घरी विषारी औषध घेवून आत्महत्या केली. यातील आरोपी भोजु विठोबा चव्हाण, ताराचंद विठोबा चव्हाण, लुकेश बाबुराव चव्हाण, शांताबाई ताराचंद चव्हाण, संगीता लुकेश चव्हाण, सचिन ताराचंद चव्हाण, सुमन बाबुराव चव्हाण यांनी मयत रमणाबाईचा मुलगा सोमनाथ दासु राठोड (वय ३५ वर्षे) व त्यांची पत्नी, भाउ धोंडीराम, वहिणी शालुबाई, पुतण्या श्रीरुप यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी रॉडने मारहाण केली होती. त्यांच्या जाचास व त्रासास कंटाळुन रमणाबाई चव्हाण यांनी आत्महत्या केली. फिर्यादी सोमनाथ राठोड यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं. कलम- १०८, ११८(२), ११५(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे

# मानेवाडीच्या उपसरपंचपदी सुवर्णा सगट यांची निवड



**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील मानेवाडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुवर्णा लहू सगट यांची निवड करण्यात आली असून, यावेळी तुळजापूर तालुका शिवसेना शिंदे गटे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुका अध्यक्ष अमोल जाधव, उपशहर प्रमुख रमेश चिवचिवे, सोमनाथ गुडे, शहाजी हाके, बालाजी लकडे, दयानंद गडदे, भैरू माने, लक्ष्मण माने, केशव सकट, केरबा माने यांच्यासह मानेवाडीतील ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरीसी जाऊ,जीवाच्या जीवाला पाहू

आषाढी वारी म्हटलं की सगळ्यांचे लक्ष देहू ,आळंदी, पंढरपूर ,शेगाव,संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज,श्री संत निवृत्तीनाथ महाराज, श्री सोपान काका महाराज, संत मुक्ताई, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी दिंडी सोहळ्याकडे सर्वांचे लक्ष आकर्षित होते. शेकडो वर्षापासून पिढ्यानपिढ्या चालत आलेली ही भागवत धर्माची पायी वारी ! ज्ञानियांचा राजा गुरु महाराजापासून चालत आलेली ती आजतागायत चालू आहे. भविष्यातही अशीच राहणार आहे. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस, आषाढी पायी वारीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्वश्रेष्ठ संत आणि लक्ष लक्ष भक्तांच्या चरणावरी मस्तक हे माझे. पृथ्वीवरील प्रत्यक्ष स्वर्ग म्हणजे पंढरी. सर्व संतांचे भक्तांचे माहेर म्हणजे पंढरी. सर्व संतांच्या सर्व भक्तांच्या जीवाचा जिवलग जिथे राहतो ती नगरी म्हणजे पंढरी. चंद्रभागेच्या तीरावर वसलेली वैकुंठ नगरी म्हणजे पंढरी. भक्त पुंडलिकाने विठ्ठलाला उभारण्यासाठी फेकलेली वीट म्हणजे पंढरी. भीमेच्या तटावर उभी असलेली ती पंढरी. आषाढी वारीसाठी ज्या ठिकाणी लक्ष लक्ष भक्तांचा महापूर येतो ती पंढरी. रात्रंदिवस टाळ मृदुंगाचा घोष आणि राम कृष्ण हरी व ज्ञानोबा तुकाराम असा जयघोष कानी येतो ती पंढरी.शेकडो संतांच्या पालख्या पायी वारी करीत ज्या ठिकाणी



एकत्र येतात ती पंढरी. ते पंढरपूर सहसा असा पंढरीचा उल्लेख केला जातो. ''जेव्हा नव्हते चराचरा ,तेव्हा होते पंढरपूर ! '' असे म्हटले जाते आषाढी वारी म्हटलं की सर्व भक्तांचे डोळे आषाढी पायी वारीकडे लागतात. पंढरपुराकडे लागतात लहान, थोर,महिला,पुरुष, बालके वृद्ध अशा सर्वच भक्तांना पंढरीच्या वारीची ओढ लागते. हातातील सर्व कामे आटोपून किंबहुना जसेच्या तसे ठेवून पंढरीच्या वारीमध्ये जाण्यासाठी सर्व भक्त व्याकुळ होतात. ज्याप्रमाणे पाण्यातून मासावर काढावा त्यावेळी त्याच्या जीवाची जी घालमेल होते तीच घालमेल आषाढी वारीमध्ये जाण्यासाठी व विठ्ठलाची भेट घेण्याची आस तळमळ भक्तांना लागलेली असते. जन्ममरणाचा फेरा चुकण्यासाठी सर्व पालख्यांचे दर्शन, संतांचे चरण स्पर्श करण्यासाठी अलोट गर्दीचा महापूर पाहून आपल्या डोळ्याचे पारणे फिटते. न भुतो न भविष्यती, असा हा पंढरपूरच्या विठ्ठलाचा पायी वारी सोहळा. सर्व लहान थोर भक्त स्वतःला विसरून घर, परिवार ,शेतीवाडी उद्योग सर्व विसरून विठ्ठल भजनी एक रूप होतात. विठ्ठल नामाच्या भजनात तल्लीन होऊन जातात. हातात भगवा पताका, गळ्यात तुळशीची माळ ,कपाळी अष्टगंध टिळा, गळ्यात टाळ ,चिपळ्या ,विना, आणि मृदुंगाच्या गोड अशा चालीवर राम कृष्ण हरी राम कृष्ण हरी आणि ज्ञानोबा तुकाराम ज्ञानोबा तुकाराम या भजनात जय जयकारात इतके तल्लीन होतात की देहभान विसरून जातात. स्वतःला तणाने व मनाने माऊलीच्या चरणी अर्पण करतात.आळंदीहून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज माऊली ,श्री निवृत्तीनाथ महाराज ,श्री सोपानदेव, संत मुक्ताई तसेच जगत गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी श्रीक्षेत्र पंढरपूर या ठिकाणी एकत्र येते .सर्व वैष्णवांचा मेळा जमतो आणि या सुखा कारणे देव वेडावला वैकुंठ सोडोनी संत सदनी राहिला अशाप्रकारे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व संत श्रेष्ठ श्री सोपान काका महाराज बंधू भेट पालख्यांची, संतांची, वारकऱ्यांची भेट होते. सगळीकडे पसरलेला सुंदर निसर्ग,झाडे, वनराई, घाटा घाटातून टाळांचा मधुर आवाज, मृदंगाची थाप आणि गायनाची लय ऐकून जणू स्वर्गप्राप्तीचाच आनंद होतो.जोपर्यंत या पृथ्वीतलावर चंद्र आणि सूर्य आहेत तोपर्यंत हा सुख नेत्र दीपक वारीचा सोहळा राहणारच आहे .माणसाला माणुसकी शिकवते वारी. वारी केल्यामुळे माणसातील अहंकार गळून पडतो, स्वार्थ नाहीसा होतो, माणसातील माणूस दिसतो. आपलेपणा, आपुलकी निर्माण होते, मनामध्ये कुठलाही क्लेश द्वेष उरत नाही. कारण भक्ताच्या प्रेमापोटी बारा वर्षे खंडाच्या रूपाने श्रीनाथांच्याघरी पाणी भरणारा विठ्ठल. संत जनाई व सखुबाईसाठी संकट समई धावणारा विठ्ठल, संत चोखामेळा यांच्या घरी येऊन पत्नीचे बाळंतपण करणारा विठ्ठल, संत नामदेवाची प्रत्यक्षात खीर खाणारा विठ्ठल, संत तुकोबाची गाथा पाण्यातून जशीच्या तशी वर काढणारा विठ्ठल, भक्त पुंडलिकाची माता पित्याची सेवा पाहून पंढरीत आजपर्यंत विटेवर उभा असणारा विठ्ठल !! म्हणजे आपल्या सर्वांच्या जीवाचा जिवलग आहे. आपणा सर्वांचा प्राण आहे,श्वास आहे, ध्यास आहे विठ्ठल, म्हणून भक्तगण आपल्या हृदयातून आळवीत असतात चला हो पंढरीसी जाऊ जीवाच्या जिवलगा पाहू!

देविदास पांचाळ,
सैनिक स्कूल,तुळजापूर

# वाढीव टप्पा अनुदान न दिल्यामुळे शिक्षक परिषदेच्या वतीने जिल्ह्यात ८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलन

**आरंभ मराठी | धाराशिव**

अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना व वर्ग तुकड्यांना देय असलेले २० टक्के वाढीव टप्पा अनुदान न दिल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षक समन्वय संघ यांच्या वतीने दि. ८ व ९ जुलै रोजी जिल्ह्यात शाळाबंद आंदोलन करणार असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली यासंदर्भात शुक्रवारी ( ता. ४ ) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की , राज्यातील अंशतः अनुदानित प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना व वर्ग तुकड्यांना २० टक्के वाढीव टप्पावाढ




अनुदान देण्यासंदर्भात तत्कालीन राज्य सरकारने १४ ऑक्टोबर , २०२४ रोजी शासन निर्णय काढला. मात्र मागील दोन अधिवेशनात व चालू पावसाळी अधिवेशनात देखील शासनाने वाढीव अनुदानासाठी आर्थिक तरतूद केलेली नाही. शासनाने वारंवार शब्द देऊनही शिक्षकांची फसवणूक केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षक समन्वय संघ यांनी दि. ८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक , प्राध्यापक , मुख्याध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिक्षण संस्था चालक व शिक्षण प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे , असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केले आहे.

# एसबीआय बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त बँक व रोटरी क्लबमार्फत विद्यार्थ्यांना मदत

**आरंभ मराठी | उमरगा**



उमरगा येथील एसबीआय बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त बँक व रोटरी क्लब मार्फत विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली. यावेळी उमरगा जिल्हा परिषद हायस्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांचे बँक अकाउंट ओपन करणार असल्याचे शाखाधिकारी शितल रासकर यांनी सांगितले. माजी विद्यार्थिनी प्रतिभा कोकणे जगदाळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना २३ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटले. तर रोटरीचे अध्यक्ष सतीश साळुंके यांच्याकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत केली करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुजाता मोरे तर प्रमुख उपस्थिती युवासेना नेत्या शिवाई किरण गायकवाड, एसबीआय बँकेच्या शाखाधिकारी शितल रासकर, रोटरीचे अध्यक्ष सतीश साळुंके, माजी गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, राम कोकणे, अंजना कोकणे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. रोटरीचे अध्यक्ष सतीश साळुंके यांच्या संकल्पनेतून नोटबुक बँक ही नावीन्यपूर्ण संकल्पना शाळेत सुरू केली आणि या नोटबुक बँकेसाठी स्वतः सतिश साळुंके यांनी पाचशे वह्या मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांना सुपूर्त केल्या. याच कार्यक्रमात शासनाकडून सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ४५ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे सूत्रसंचालन शिल्पा चंदनशिवे तर आभार ममता गायकवाड यांनी मांनले.

# बाजार समितीचे कर्मचारी साळुंखे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



**आरंभ मराठी | धाराशिव**

कृषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूरचे वरिष्ठ शिपाई सिद्धेश्वर बाबुराव साळुंखे नियत शासकीय वयोमनुसार बाजार समितीतील सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा दिनांक ४ जुलै रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूरचे सर्व संचालक मंडळ व बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येऊन त्यांच्या आयुष्यातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बाजार समिती सभापती आशिष सोनटक्के, माजी सभापती विजय गंगणे, उपसभापती सुहास गायकवाड, संचालक दीपक आलुरे, विजय शिंगाडे, सिद्धेश्वर कोरे, सुनील जाधव, बालाजी रोचकरी, संतोष कदम, दत्तात्रय वाघमारे, बाजार समिती सचिव उमेश भोपळे, लेखाधिकारी शिवानंद राठोड, प्रमोद पडवळ, नागेश देशमुख, सुनील लोमटे, लिंबाजी सरडे यांच्यासह व्यापारी व हमाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेवानिवृत्त शिक्षिका महादेवी कोरे व माजी मुख्याध्यापक वाघ यांचा निरोप समारंभ उत्साहात

**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेत सेवानिवृत्त शिक्षिका महादेवी कोरे व माजी मुख्याध्यापक संदीप वाघ यांचा निरोप समारंभ शनिवारी (दि.५) उत्साहात संपन्न झाला. ३१ मे रोजी महादेवी कोरे प्राथमिक शिक्षिका पदावर ४० वर्षे सेवा करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. तसेच प्रशालेचे माजी मुख्याध्यापक संदीप वाघ यांची प्रशासकीय बदली झाली. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव, प्राथमिक शाळा सावरगाव, कन्या प्राथमिक शाळा सावरगाव, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्या वतीने दोघांना एकत्रितपणे निरोप देण्यात आला. महादेवी कोरे व संदीप वाघ यांनी प्रशालेचा नावलौकिक वाढविण्यात खूप मोठे




योगदान दिल्याचे सर्वांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य राजकुमार पाटील, विशाल सुर्यवंशी, नितीन गायकवाड, बापू काळे आदींनी दोघांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल गौरव उद्गार काढले. प्रशालेतील विद्यार्थी व विद्यार्थिनीनी ही आपल्या शिक्षकांप्रती भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक रमाकांत गुरव, माजी अध्यक्ष रामराजे पाटील, अध्यक्ष अतुल पवार, सदस्य रामेश्वर माळी, कानिफनाथ माळी, अमोल काळदाते, रमेश काडगावकर, गोकुळ शिंदे, पांडुरंग हागरे, फडके, महादेव कोरे, महिला पालक , माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कुमारी ज्ञानेश्वरी डोके व सृष्टी मगर यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमारी श्रावणी मगर व अनन्या काळदाते यांनी केले.

# भाई उद्धवराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

## स्व.भाई बळवंतराव घोगरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष सोहळा उत्साहात

**आरंभ मराठी | धाराशिव**

भाई उद्धवराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी कामगार पक्षाचे नेते, झुंजार सेनानी, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.) चे माजी जनरल सेक्रेटरी स्व. भाई बळवंत बप्पा घोगरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शनिवारी (दि.५) विविध गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे. एन. गवाड (माजी मुख्याध्यापक) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून धर्मवीर कदम उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती श्रीमती राणी दाजी पवार (नगरसेविका), माने (माजी सैनिक), के. व्ही. शेख (माजी मुख्याध्यापक), आर. पी. उजनकर



(माजी मुख्याध्यापक), दाजीप्पा पवार (सामाजिक कार्यकर्ते), अमोल घोगरे (मुख्याध्यापक, भाई उ.पा.प्रशाला, धाराशिव), श्रीमती एस. टी. गंगावणे (प्राथमिक मुख्याध्यापिका) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रशालेचे मुख्याध्यापक अमोल घोगरे म्हणाले, ''स्व. बळवंत बाप्पांचे जीवनकार्य हे संघर्षमय आणि निष्ठेने परिपूर्ण होते. त्यांनी राजकारण, समाजकारण व शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. ग्रामपंचायतीचे सरपंच अनेक योजना त्यांनी गावात सुरू केल्या. कार्यक्रमात इ. १० वीतील गुणवंत विद्यार्थी, शिष्यवृत्ती धारक, स्कॉलरशिप विद्यार्थी, प्राथमिक ऑलिंपियाडमधील यशस्वी विद्यार्थी तसेच जन्मशताब्दी वर्षानिमित्त घेतलेल्या वक्तृत्व, चित्रकला व रांगोळी स्पर्धांतील विजेत्यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन पालकांसोबत गौरव करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात जे. एन. गवाड म्हणाले, ''बळवंत बाप्पा हे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. वाचनाची आवड, वेळेचे भान, दूरदृष्टी, शिस्त, व्यसनमुक्त जीवनशैली, आणि शेतकऱ्यांसाठी असलेली तळमळ ही त्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांनी गोरगरीब मुलांसाठी शिक्षण संस्था स्थापन करून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमासाठी प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप माळी यांनी केले व आभार प्रदर्शन एच. व्ही. घेवारे यांनी केले.

# महात्मा बसवेश्वर सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी वरनाळे, व्हाईस चेअरमनपदी मुदकन्ना यांची फेरनिवड

## माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या उपस्थितीत भव्य सत्कार सोहळा

**आरंभ मराठी | मुरूम**

मुरुम शहरातील महात्मा बसवेश्वर सहकारी पतसंस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळ निवडणुकीनंतर नवनिर्वाचित संचालक मंडळाने शनिवारी (ता. ५ जुलै) रोजी सर्वानुमते शिवशरण वरनाळे यांची चेअरमन म्हणून, तर शरणप्पा मुदकन्ना यांची व्हाइस चेअरमन म्हणून बिनविरोध निवड केली. ही निवड जागतिक सहकार दिनाच्या निमित्ताने पतसंस्थेच्या बसव सहकार भवनच्या सभागृहात पार पडली. यावेळी पतसंस्थेच्या वतीने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ज्ञानराज चौगुले होते. विचारपीठावर ज्येष्ठ नेते भीमराव वरनाळे, पॅनल प्रमुख चंद्रशेखर मुदकन्ना, भारत शिक्षण संस्थेचे संचालक तानाजी फुगटे, व्यापारी पतसंस्थेचे नूतन संचालक बाबासाहेब बिराजदार, शिवसेना तालुकाप्रमुख बळीमामा सुरवसे, तालुका उपप्रमुख व्यंकटराव पाटील, आप्पासाहेब पाटील, माजी प्राचार्य दत्ता इंगळे, बलभीम



येवते आदी मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन शिवशरण वरनाळे आणि व्हाइस चेअरमन शरणप्पा मुदकन्ना यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी बोलताना चौगुले यांनी पतसंस्थेच्या सामाजिक व आर्थिक योगदानाचे कौतुक केले आणि संस्थेच्या आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी नवीन नेतृत्वाकडून पारदर्शक कारभार व सभासदांच्या हितासाठी कार्य करण्याचा संदेश दिला. त्यांनी सहकार चळवळीच्या महत्वावर प्रकाश टाकला व पतसंस्थेला भक्कम आर्थिक पाया देण्यासाठी सर्व संचालकांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. यावेळी माजी प्राचार्य दत्ता इंगळे, चेअरमन शिवशरण वरनाळे, पॅनल प्रमुख चंद्रशेखर मुदकन्ना यांचीही मनोगते झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन जाधव यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. दत्ता इंगळे यांनी केले. आभार प्रदर्शन मनीष मुदकन्ना यांनी मानले. या कार्यक्रमाला पतसंस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी, सभासद आणि मुरुम परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड

**आरंभ मराठी | धाराशिव**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांची विविध कंपनी मध्ये कॅम्पस प्लेसमेंट मधून नुकतीच निवड झाली. पुणे येथील नामंकित कंपनी जयहिंद मोटर्स, सेडमक आणि वेलमेड युरोपलॉकर्स पुणे स्थित या तीन कंपनीमध्ये महाविद्यालयाच्या मेकॅनिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांची निवड झाली. जयहिंद मोटर्समध्ये प्रज्ञा नारगळे, शुभांगी आगाशे, काझी सोहेल, कृष्णा पांचाळ, विशाल सुतार, अश्विनी अभंगे, स्वीटी ओहोळ, नंदकिशोर बट्टू, महेश राठोड या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तर तेजस घोडके याची सेडमक मध्ये निवड झाली आहे. वेलमड यूरोपलॉकर्स मध्ये काझी अश्फाक, विशाल चव्हाण, महेश राठोड, ओंकार कुलकर्णी, बालाजी कदम यांची निवड झाली आहे. जयहिंद या कंपनी ची मुलाखत प्रक्रिया कंपनी प्रतिनिधी संतोष कदम यांनी पाहिली. सेडमक या कंपनीची मुलाखत प्रक्रिया




कंपनी प्रतिनिधी प्रकाश क्षीरसागर यांनी पाहिली तसेच वेलमेड युरोपलॉकर्स या कंपनीची मुलाखत स्वप्नील जैन यांनी राबवली. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी अभिनंदन केले. या ड्राईव्हचे आयोजन प्रा. अशोक जगताप, प्रा. रणजित दंडनाईक ,प्रा . अनिरुद्ध देशपांडे, रामेश्वर मुंढे यांनी केले होते. तेरणा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, संस्थेचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील, मेघ पाटील आणि व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे व सर्व विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# डॉ.रामानुजन इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रम

**आरंभ मराठी | उमरगा**

उमरगा शहरातील आषाढी एकादशी निमित्त डॉ. रामानुजन इंग्लिश मेडीकल स्कूल या शाळेमध्ये दिंडी, पाऊल खेळ, महिला साठी फुगडी, भक्ती गीत, संत गोरोबा काका याच्या वरील नाटिका सादर करण्यात आली. यावेळी दिल्ली येथे झालेल्या दुसरी इनडोअर मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये विशेष प्रविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. यात साहिल शेख, आराध्या जाधव, नवाज मुर्शीद, आराध्या शेटगार, आयुष पवार यांचा समावेश होता. शाळेतील कार्यक्रमात प्रमुख पाहुणे रुपसिंग सागर माजी



मु.अ. देशिकेंद्र विद्यालय लातूर, संध्या सगर माजी मु.अ. आदर्श विद्यालय उमरगा, संस्थेचे अध्यक्ष महेश अंबर, सचिव माळी, सुभाष चव्हाण, गंगा अंबर, दुर्गारांनी बिद्री, श्रीनिधी घोडके, अंकिता पुजारी, संध्या ममाळे, कांचन आलमाले, निशा कोकणे, शीतल बनसोडे, सचिन पाटील, अनिता गडदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला माता पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.